REVIEW OF RESEARCH

'अस्तित्व' कथासंग्रहातून व्यक्त होणारी ग्रामीण माणसे आणि ग्रामीण जीवन

डॉ. संभाजी मलघे

इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव, पुणे.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019

प्रस्तावना :

'अस्तित्व' हा शिवराज सगळे यांचा कथासंग्रह आहे. त्यांच्या या पहिल्याच कथासंग्रहाने मान्यवर लेखक आणि समीक्षकांना दखल घ्यायला भाग पाडले आहे. या संग्रहाच्या प्रस्तावनेमध्ये प्रशांत मोरे म्हणतात, ''ग्रामीण भागाचा चेहरा झपाटयाने बदललाय. बियरबार ओसंडून वाहू लागलेत, एक पिढी त्यात नासली. जी वाचली त्यामध्ये शिवराज हे नाव होय. कथालेखनालाच शिवराजने व्यसन मानलं. दुसरी गंभीर घटना म्हणजे याच दशकाने आत्महत्यांचं आभाळभर दुःख झेललं. घरात कोणताही साहित्यिक वारसा नसताना, कुटुंबात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिरता नसताना, शेतकरी, कष्टकरी आत्महत्या करत असताना शिवराज नावाचा हा तरूण लेखणीला प्रमाणभूत मानून, परिस्थितीला शरण न जाता, परिस्थितीला शरण आणतो. कष्टांसह हालअपेष्टा सहन करून संघर्ष करणाऱ्या शिवराज सगळ या मित्राला सलाम.''[1] या त्यांच्या विचारातून लेखकाची पार्श्वभूमी स्पष्ट होते. शिवराज सगळे यांनी जे जीवनानुभव घेतले आहेत, त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमधून दिसून येते.

ग्रामीण कथालेखकामध्ये नव्या पिढीतील संजय कळमकर, हिंमत पाटील, बाबासाहेब परीट, ज्योतिराम फडतरे या मालिकेमध्ये शिवराज सगळे यांचाही समावेश करावा लागतो. 'अस्तित्व' या कथासंग्रहामध्ये नऊ कथा आहेत. यामध्ये 1. पहिलवान 2. अस्तित्व 3. इस्वासाची कंदुरी 4. वेडा बाप 5. कवठीचं भूत 6. ओळख 7. भाळावरला चांद 8. चंदनमाती 9. मधुचंद्र इ. यामधून वेगळी ग्रामीण माणसे आणि ग्रामीण जीवन व्यक्त झाले आहे.

'पहिलवान' कथेमध्ये 'पहिलवान' बनविण्याचा हट्ट धरणारी वडीलधारी माणसं, मामा, यामुळे घडणारे प्रसंग मांडले आहेत. कुस्ती जिंकण्यासाठी केलेले फसवे डावपेच या कथेत मांडले आहेत. आणि ऐनवेळी शर्यतीत भाग घेऊन विजयी झाल्यानंतर बदललेल्या नव्या परिस्थितीचे छान वर्णन केले आहे. आईच्या मृत्यूची बातमी ऐकून दुःखी झालेला पहिलवान हबकून कुस्ती हरतो याचे वर्णन लेखक असे करतात– ''माझ्या आवाजानं त्याने हबकीच खाल्ली. माझ्या मानेवरची त्याची पकड एकदम ढिली झाली. मी त्याला जोराने लोटलं. तसा तो गुढग्यावर उभा झाला. त्याच्या गुडघ्याखाली माझा पाय गुंतला मी त्याला खांद्यावर लोटला आणि 'आई गेली या आघाताने त्याने सपशेल पाठीमागे अंग टाकले' लगेच एका पंचाने माझ्या पाठीवर थाप टाकली. शाब्बासरे पठ्ठया, कुस्ती झाली. त्यांनी माझा एक हात हवेत वर केला.''[2]

अशा प्रसंगामुळे या कथा रंगतदार झाल्या आहेत. पहिलवाल विष्णूपंत, मामा, आई–वडील ही सारीच पात्रे रंगतदार आहेत. कुस्ती मारल्यामुळे आणि शर्यत जिंकल्यामुळे लग्न जमते. या घटना ग्रामीण विश्वातील ग्रामीणता व्यक्त करतात.

'अस्तित्व' या कथेमध्ये राघू, तात्या, मैनाकाकू, नंदकिशोर प्रिया आदि पात्रे आली आहेत. माणसाचेच जर झाड झाले तर काय होईल? अशी भावनिकता मांडून केलेले नाटकातील 'नाटय' या कथेत मांडले आहे. कथेच्या समारोपात लेखक लिहितात– ''नंदू जिथं गुडघ्यावर बसून रडत होता, तिथंच जमिनीवर वडाचं एक छोटसं रोपटं होत. त्याच्या पोपटी पिवळसर नाजूक कोवळया पानावर नंदूच्या डोळयातले अश्रू पडले होते. इवलसं रोपटं जणू नंदूकडे पहातंय असा भास नंदूला

होत होता. दोघांनीही डोळे पुसले. नंदूनं ते इवलंस रोप मातीच्या गोळयासह उपटून ओंजळीत घेतलं आणि आनंदानं घरी परतले. त्या छोटया रोपटयाची पूजा करून बंगल्यासमोरच्या मोकळया जागेत त्याचं रोपण केलं. सपत्निक पूजा करून अतिशय आनंदानं देवतांब्यानं त्याच्यावर पाण्याची संथ धार सोडत त्याला त्याच्या नव आयुष्या शुभेच्छा दिल्या.''[3] ही भावनिकता लेखकाने मांडली आहे. कथेच्या शेवटी कलाटणी देण्याचे लेखकाचे तंत्र आहे. मात्र ही कलाटणी कथेशी असंगत वाटत नाही. यामुळे शिवराज सगळे यांच्या कथांनी उंची गाठली आहे या कथा संस्कार करतात, मूल्य शिकवतात. म्हणून या कथा वेगळया आहेत.

'इस्वासाची कंदुरी' या कथेमध्ये श्रद्धा–अंधश्रद्धा या विचारांची गुंफण केली आहे. ग्रामीण माणसाच्या मनात आजही अनेक श्रद्धा अंधश्रद्धा मूळ धरून आहेत. कंदुरी केली म्हणजे मनाप्रमाणे घडेल असा समज आजही ग्रामीण भागातील लोकांमध्ये आहे.

या कथेतही अशीच अपेक्षा व्यक्त केली आहे. या कथेमध्ये विश्वास, पारूबाई, ठकामावशी, सुलाबाई, सरपोतदारसाहेब आदी पात्रे आली आहेत. कंदुरी करण्यासाठीचा आटापिटा, जमवाजमव लेखकाने मांडली आहे. मात्र महिना–दीड महिना तयारी करून, खस्ता खाऊनही काही पदरात पडत नाही. शेवटी पदरी निराशच येते. हे वर्णन लेखकाने असे केले आहे. ''ती रात्र पेंगत काढली. भोन्याआईची कंदुरी समाधानानं, आनंदाने पार पडेल म्हणून दोघा नवरा बायकोनी एक–दीड महिन्यांपासून जिवाचं रान केलं व्हतं. पण सारं काही व्यर्थ गेलं होतं. उलट दोघांनाही मनस्ताप झाला होता. 'आपलं काही चुकलं तवा भोन्याआई आपल्यावर कोपली'' पारुबाई नव-याच्या तोंडाकडे पहात म्हणाली. विश्वासरावांनी नुसतं न बोलता तिच्याकडं पाहिलं. विश्वासरावांनी मोठ्या श्रद्धेने, भरवशानं, भोन्याआईला कंदुरी नेली, पण निसर्गाच्या या अवखळ कार्यक्रमामुळं त्यांच्याच इस्वासाची कंदुरी झाली.''[3]

एखादी गोष्ट श्रद्धेने करावी मात्र हाती काही पडू नये अशा वेळी ग्रामीण माणसे दुःखी कष्टी होतात. देवावरचा विश्वास डळमळीत होऊ लागतो. 'कंदुरी' मध्ये प्राण्याचा बळी दयाबा लागतो तसाच बळी अंधश्रद्धेचाही. दिला तरच आयुष्य विचारांच्या मार्गाने चालू लागेल असा संदेश ही कथा देते. ही कथा ग्रामीण माणसाच्या श्रद्धांमागच्या अनेक गोष्टींना स्पष्ट करते.

'वेडाबाप' या कथेमधून बापाची माया स्पष्ट केली आहे. काही माणसांचे मोल ते ह्यात असताना समजत नाही. मात्र ही माणसे दूर निघून गेल्यानंतर त्यांचे महत्त्व उमगते. या कथेतील आप्पासाहेब असेच आहेत. प्रकाशला आप्पासाहेबांचे मोल, माया कळते. मात्र आप्पासाहेब देवाघरी गेल्यानंतर या कथेतून ग्रामीण बाबाचे हळवे मन कथाकार शिवराज सगळे यांनी असे मांडले आहे. ''दुसरी चिट्टी प्रकाशला लिहिली होती ती अशी– ''बाळ, एकदा तरी भेटायला येशील असं वाटलं होतं. बरेच दिवस वाड्याच्या दरवाजात, कधी गावच्या वेशीत, तू येशील अशी वेडी आशा मनाशी बाळगून तुझी वाट पाहयली रे, डोळे नाही थकले कधी. पण नाही आलास तू म्हणून मी रुसलो नाही तुझ्यावर. बघ आजही मी तुझीच वाट पाहतोय. आलास तू पण उशीर केलास रे.... नेहमीचीच सवय तुझी– तुझे बाबा प्रकाशच्या डोळ्यातील आसवांनी चिट्ठी भिजून गेली.''[4]

एका वेड्या बापाची ही वाट पाहण्याची कमाल मर्यादा. तरुण पिढी आपल्या आईबापांच्या भावना समजावून घेऊ शकत नाहीत. त्यांचे प्रेम त्यांची माया हा जणू त्यांना वेडेपणामागचे मायेचे बंध समजले नाहीत, आणि वेळ निघून गेली तर मागे हळहळ आणि पश्चाताप उरतो हे सत्य कथालेखकाने अधोरेखित केले आहे.

'कवठीचं भूत' या कथेमध्ये गावातल्या लोकांच्या मनातल्या अंधश्रद्धा, भीती यांचं दर्शन मांडले आहे. गणा आणि पिंट्यामामा ही प्रातिनिधिक पात्रे ठरतात. 'भूत' या कल्पनेभोवतीची कथा ग्रामीण माणसांच्या अंधश्रद्धानिर्मितीच्या कारणांचा शोध घेणारी कथा ठरते. अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करणा-यांनाच अंधश्रद्धेचा तडाखा देण्याचा प्रयत्न कसे केले जातात हे या कथेतून मांडले आहे. ''त्या कवठीविषयी लोकांच्या मनातील भीती दूर करण्याकरीता मला वेळ मिळंल तेंव्हा त्या कवठीच्या झाडाकडं मुद्दाम जायचो. पण मलाच त्या कवठीच्या भुतानं झपाटलं, अशी अफवा वडगावात पसरली. मी भर अमावशा–पौर्णिमेला त्या भुताबरोबर तासन्तास गप्पा

मारतो, अशी चर्चा होऊ लागली. कवठीच्या भुताला लोक तर घाबरत होतेच; पण आता मलाही घाबरायला लागले. काय म्हणतात ना ते करायला गेलो गणपती अन् झाला मारुती, अशी माझी गत झाली.''[5] काहीही झालं तरी माणसे मूळ कल्पनांना धक्का लावू देत नाहीत. कारण या पक्क्या धारणा काढणे खरोखर अवघड काम असते. ग्रामीण जीवन हे असेच आहे. ग्रामीण माणसे आपापल्या विचारांना घट्ट कवटाळून जगते. या विचारांमध्ये, जगण्यामध्ये बदल करण्याच्या फंदात ते पडत नाहीत, हे लेखकाने स्पष्ट केले आहे.

'ओळख' कथा ही वेगळ्या धाटणीची कथा आहे. जी माणसं आपण आपली मानतो, तिच माणसं परक्यासारखं वागू लागली की एक अस्वस्थपणा वाटू लागतो. घरामध्ये एक कटू वातावरण निर्माण होतं. मानवी भावना ह्या नातेसंबंधाने भिजलेल्या असतील तर त्या निखळ राहतात, मात्र त्यांना स्वार्थाची बाधा झाली तर हे नातेसंबंध 'परके' होतातमदत करणारी परकी माणसे 'नात्यातली' वाटू लागतात. बऱ्याचदा याला परिस्थिती कारणीभूत असते. ''गेल्या वर्षीचा पावसाचा अवमेळा, त्यानं गावावर दुष्काळाचं सावट पहारलेलं ओळखीची माणसंही राम–राम घालायला जाजू करायची. पूर्वी तासन्तास कट्ट्यावर गप्पा झोडणारेही आता ओळख विसरायला लागले होते. अंगात काम करण्याची उमेद; पण मोकळ्या हाती काय लागेना. भरलं कुटुंब खर्चाला बोजा वाढता. घरातील वाद वातावरण एखाद्या भीषण दंगलीप्रमाणे वाटायचं थोरला भाऊ कारखान्यात कामाला लावला, तेंव्हा वडिलांनी सावकाराकडून तीस हजार उचलेले. भावाला काम लागलं, पण दुष्काळी परिस्थितीमुळे कारखाना बंद पडला. तेंव्हापासून तोही घरीच घरामध्ये कोणत्या ना कोणत्या कारणामुळे धुसफूस सुरु असायची.''[6] लेखकाने उभं केलेलं हे चित्र म्हणजे ग्रामीण भागाचा आरसा आहे. दुष्काळात, टंचाईच्या काळात हेच वातावरण पहायला मिळतं. माणसामाणसांमधील नाती विस्कळीत होऊ लागलेली दिसतात.

'भाळावरला चांद' या ही आशादायी माणसाची कहाणी आहे. ग्रामीण माणसे आपली परिस्थिती आज ना उदया बदलेल अशी आशा बाळगत असतात. परिस्थिती माणसाचा घात घेऊन पाहते मात्र एकमेकांना मदत करणारी माणसं असं होऊ देत नाहीत.

'चंदन माती' या कथेमधून परिस्थितीच्या कचाट्यात सापडलेल्या माणसाच्या जगण्याची कहानी सांगितली आहे. गरिबीपासून सुटका करण्यासाठी माणसे कृत्ये करतात, त्याचा फटका त्यांना सहन करावा लागतो हे या कथेचे मुख्य सूत्र आहे. चंदनाची झाडे पैसा देतात मात्र, ती चोरीची असतील तर? शिक्षा ही ठरलेली. त्यामुळे आयुष्याची माती होती. 'टेलर' सारख्या माणसांनी सरळ साधे जीवन जगावे. या जगण्यातच आनंद आहे. तो आनंद कष्टातून मिळतो, प्रामाणिकपणातून मिळतो. या मूल्यांकडे ही कथा लक्ष वेधते.

'मधुचंद्र' या कथेमधून काही गंमती–जमती कथालेखकाने मांडल्या आहेत....वास्तवातल्या जगण्यात 'मधुचंद्राची' स्वप्ने पाहता येत नाही. कष्टकऱ्यांना कौटुंबिकसर्वसामान्य माणसांसारखाच सामान्य असतो. लग्न झाल्यानंतर कुठे दूर शहरात, परदेशात जाण्याची कल्पनाही. करता येत नाही. कारण परिस्थिती हलाखिची असते. ग्रामीण भागातील नवदांपत्याचे जीवन आपल्या घरातच सुरु होते... तेच त्यांचे सहजीवन तोच त्यांचा मधुचंद्र या कथेतील नवविवाहिता 'मधू' ही ग्रामीण मुलींची प्रातिनिधिक प्रतिमा आहे. मर्यादित स्वप्ने पाहणारी...छोट्या सुखांनी समाधानी होणारी.

'अस्तित्व' कथासंग्रहातून अशी ग्रामीण माणसे आणि ग्रामीण जीवन व्यक्त झाले आहे. कथालेखक शिवराज सगळे हे अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील रहिवासी आहेत. अहमदनगर जिल्ह्याचे शेवटचे टोक, तिथून पुढे बीड जिल्हा सुरु होतो. दुष्काळी परिस्थितीत मोल मजुरी करणाऱ्या या ग्रामीण भागातील माणसे, त्यांचे जगणे या कथालेखकाने उभे केले आहे. या कथांना या परिसराचा रंग, गंध लाभला आहे. म्हणूनच तिथली माणसे आणि त्यांचे जीवन ठसठशीतपणे व्यक्त झाले आहे.

प्रा. द. ता. भोसले यांनी सन 2000 नंतरच्या कथालेखनाविषयी म्हटले आहे. ''गोष्टींवर भर देणारी मराठी कथा घटना प्रसंगांच्या पलीकडे जाऊन मानवी मनाचे गुंतागुंतीचे व्यापार आविष्कृत करण्यापर्यंत विकसित झाली आहे.''[7] हाच विकसितपणा 'अस्तित्व' कथासंग्रहामधून दिसून येतो.

संदर्भ–

1. सगळे शिवराज, 'अस्तित्व' (कथासंग्रह) यशोदीप पब्लिकेशन्स पुणे प्रथम आवृत्ती–2017, पृ.
2. सगळे शिवराज, 'अस्तित्व', उपरोक्त, पृ.58
3. सगळे शिवराज, 'अस्तित्व', उपरोक्त, पृ.79
4. सगळे शिवराज, 'अस्तित्व', उपरोक्त, पृ.86
5. सगळे शिवराज, 'अस्तित्व', उपरोक्त, पृ.99
6. सगळे शिवराज, 'अस्तित्व', उपरोक्त, पृ.100
7. डॉ. शेळके भास्कर डॉ. गुंजाळ बाळासाहेब (संपादक), 'कथागौरव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती–2009, पृ.60

LBP PUBLICATION